कंत्राटदारांच्या नोंदणीचे सुधारित नियम दिनांक २० एप्रिल, १९९८ च्या शासन निर्णयातील व दिनांक २१ सप्टेंबर, २००० च्या शासन परिपत्रकातील सुधारणा / बदलाबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : सीएटी १०९६/प्र.क्र.१७२/इमारती-२
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- ११ ऑक्टोबर, २००१

कंत्राटदाराच्या नोंदणीबाबतच्या शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. सीएटी १०९६/प्र.क्र.१७२/ इमारती-२, दिनांक २० एप्रिल, १९९८ मध्ये सुधारणा/बदलांबाबत शासन परिपत्रक क्र. सीएटी १०९६/प्र.क्र.१७२/इमारती-२, दिनांक २१ सप्टेंबर,२००० अन्वये काही तरतुदींत सुधारणा/बदल करण्यांत आले आहेत.

२. दिनांक २१ सप्टेंबर, २००० पूर्वी किंवा त्यादरम्यान, २० एप्रिल, १९९८ च्या शासन निर्णयाप्रमाणे झालेल्या नोंदणीतील निकष व दिनांक २१ सप्टेंबर, २००० च्या शासन परिपत्रकाप्रमाणे झालेल्या नोंदणीतील निकष उदा. यंत्रसामुग्री, खाजगी कामे बाबत तफावत राहते. म्हणून दिनांक २० एप्रिल, १९९८ च्या शासन निर्णयान्वये दिनांक २१ सप्टेंबर, २००० पूर्वी किंवा त्या दरम्यान नोंदणी प्राप्त झालेले ठेकेदार व दिनांक २१ सप्टेंबर, २००० च्या शासन परिपत्रकान्वये नोंदणी प्राप्त झालेले ठेकेदार यांना समान पातळीवर आणणे गरजेचे आहे.

३. वरील बाबी विचारात घेता असे आदेश देण्यात येत आहे की, दिनांक २१ सप्टेंबर, २००० पूर्वी किंवा त्या दरम्यान दिनांक २० एप्रिल, १९९८ च्या शासन निर्णयाप्रमाणे नोंदणी/नूतनीकरण करुन घेतले आहे,अशा वर्ग-१ ते वर्ग-५ मधील नोंदणीकृत कंत्राटदारांनी दिनांक २१सप्टेंबर, २००० च्या शासन परिपत्रकातील अटी व निकषानुसार योग्य त्या वर्गात / उपवर्गात नूतनीकरण दिनांक ३१ डिसेंबर, २००१ पूर्वी सक्षम अधिकाऱ्यांकडून प्राप्त करुन घ्यावे. अन्यथा दिनांक २१ सप्टेंबर, २००० पूर्वी किंवा त्या दरम्यान मंजूर झालेली परंतु दिनांक २१ सप्टेंबर, २००० च्या परिपत्रकातील अटी व निकषात न बसणारी नोंदणी दिनांक ३१ डिसेंबर, २००१ नंतर रद्द समजण्यांत येईल.

४. दिनांक २१ सप्टेंबर, २००० च्या शासन परिपत्रकातील अटी व निकषानुसार योग्य त्या वर्गात/उपवर्गात नूतनीकरणाचे प्रस्ताव, पूर्वी ज्या कार्यकारी अभियंत्यांच्या कार्यालयातून सादर केले होते, त्याच कार्यकारी अभियंत्यांच्या कार्यालयाकडून सादर करण्यात यावेत.

( शि. वि. तामखडे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,
मा.मुख्यमंत्री ह्यांचे प्रधान सचिव,
एच-701(2500-10-01)1

(कृ.मा.प.

मा.मंत्री (सा.बां.)/पाटबंधारे ह्यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (सा.बां.)/पाटबंधारे ह्यांचे खाजगी सचिव,
वित्त विभाग/सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,
महालेखापाल-१, मुंबई/महालेखापाल-२, नागपूर,
सचिव (रस्ते)/सचिव (बांधकामे), सार्वजनिक बांधकाम विभाग, ह्यांचे स्वीय सहाय्यक,
पाटबंधारे विभाग, मंत्रालय,
सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय,

प्रत माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी -

सर्व मुख्य अभियंते, सा.बां.विभाग/पाटबंधारे विभाग,
मुख्य अभियंता, बृहन्मुंबई क्षेत्र विकास प्राधिकरण,मुंबई, महाराष्ट्र
गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा), मुंबई, महाराष्ट्र
औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई,
व्यवस्थापकीय संचालक, शहर व औद्योगिक विकास महामंडळ,(सिडको), निर्मल बिल्डींग, नरीमन पॉईंट, मुंबई/महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई, पाटबंधारे विकास महामंडळ, कृष्णा/तापी/गोदावरी/विदर्भ, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई.
आयुक्त, सर्व महानगरपालिका (२ प्रतींसह),
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा,
अधीक्षक अभियंता व प्रादेशिक अधिकारी, भूपृष्ठ वाहतूक मंत्रालय, (MOST), चेंबूर, मुंबई,
सर्व अधीक्षक अभियंते, सा.बां.विभाग/पाटबंधारे विभाग,
अधीक्षक अभियंता, पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ वरळी, मुंबई/महानगर पालिका, ठाणे/पुणे/कल्याण
संचालक, उपवने आणि उद्याने, मुंबई,
प्रतिनियुक्तीवरील सर्व अधिकारी,
सर्व कार्यकारी अभियंते, सा.बां.विभाग/पाटबंधारे विभाग/जिल्हा परिषद,
सर्व अधिकारी/कार्यासन अधिकारी, सा.बां.विभाग/पाटबंधारे विभाग, मंत्रालय,
कार्यासन इमारती-२ (निवडनस्ती)